# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. २२ अंतर्गत लकडगंज येथील बरबटे उद्यान येथे विरंगुळा
**{सा.बां.वि. झोन क्र. ०६}** केंद्राचे बांधकाम करण्यास्तव जुनी शिकस्त झालेली ईमारत तोडण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्यास्तव सादर.

टिप :-

१. मा. आयुक्त (प्रशासक) महानगरपालिका नागपूर यांचे दि. १३/०१/२०२४ आदेश.
२. कार्यकारी अभियंता डी.पी.डी.सी. कक्ष महानगरपालिका नागपूर यांचे दि. १६/१०/२०२३ चे पत्र.
३. पत्र सदर ईमारतीचे छायाचित्र संलग्न.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 40/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 07/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गांधीबाग झोन क्र. ०६ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २२ अंतर्गत लकडगंज येथील बरबटे उद्यान येथे विरंगुळा केंद्राचे बांधकाम करण्यास्तव जुनी शिकस्त झालेली ईमारत तोडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.